Letter - 28/6/93

समाजविज्ञान अकादमी
Academy of Political and Social Studies

२१६, नारायण पेठ, पुणे ४११ 030
फोन :४५६६९४

संदर्भ : बी-१/१२0
दिनांक :- २८ जून १९९३

चर्चा

"महाराष्ट्रातील राजकारण आणि बहुजन महासंघ"

बहुजन महासंघाची स्थापना ही महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्वाची घटना आहे. या संघटनेच्या स्थापनेची आवश्यकता का भासली, तिची आजवरची जडणघडण कशी झाली आहे, तिची परिवर्तनविषयक भूमिका आणि भावी वाटचाल कोणती राहाणार आहे इत्यादी जाणून घेण्याची गरज पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांना व अभ्यासकांना जाणवत आहे. तसेच याबाबत अधिक चर्चा होण्याची देखील गरज आहे.

अकादमी तर्फे शनिवार दिनांक ३ जुलै ९३ रोजी संध्याकाळी ६.00 वाजता शहीद भगतसिंग सभागृहामध्ये या विषयावर एक चर्चा आयोजित केली आहे. या संघटनेच्या स्थापनेत विशेष आत्मीयतेने पुढाकार घेणारे साथी शांताराम पंदेरे या चर्चेसाठी आरंभीची मांडणी करणार आहेत.

चर्चा निमंत्रितांपुरतीच मर्यादित आहे. आपण:या चर्चेत सहभागी होण्यासाठी अवश्य यावे ही विनंती.

आपले,

सुधीर बेडेकर　　　　दत्ता देसाई